महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
मुंबई विभागीय मंडळ, वाशी, नवी मुंबई-400 703.
Maharashtra State Board of Secondary and Higher Secondary Education,
Mumbai Divisional Board, Vashi, Navi Mumbai-400 703.

क्र. मुंविमं/कें.नि./२०२६/ 320
वाशी, नवी मुंबई ४००७०३
दिनांक 30/०१/२०२६

प्रति,
सर्व केंद्रसंचालक,
इ. १० वी परीक्षा केंद्र शाळा

विषय:- माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१० वी) परीक्षा फेब्रुवारी-मार्च २०२६ परीक्षेसाठी केंद्रसंचालक सभेस उपस्थित राहणेबाबत.

उपरोक्त विषयानुसार आपणांस कळविण्यात येते की, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळातर्फे घेण्यात येणारी फेब्रुवारी-मार्च २०२६ माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ. १० वी) परीक्षा दि. २०/०२/२०२६ ते दि. १८/०३/२०२६ या कालावधीत आयोजित करण्यात आलेल्या आहेत. तरी सदर परीक्षेकरिता शिक्षणाधिकारी माध्य. (ठाणे, पालघर व रायगड) / शिक्षण निरीक्षक (मुंबई दक्षिण, पश्चिम व उत्तर विभाग) यांचे यांचे शिफारशीनुसार आपली नियुक्ती केंद्रसंचालक म्हणून करण्यात करण्यात आलेली आहे.

तरी परीक्षा संचालना करिता सूचना व मार्गदर्शन होण्यासाठी इ. १० वी परीक्षा केंद्रसंचालकांच्या जिल्हानिहाय सभा दि. ११,१२ व १३ फेब्रुवारी २०२६ रोजी खालीलप्रमाणे आयोजित केलेल्या आहेत. परीक्षा संचालनासाठी आवश्यक असलेले वेळापत्रक, बारकोड, फॉर्म नं. ०१-०२, अग्रिम रक्कम संदर्भातील माहिती व अन्य कागदपत्रे सभेच्या वेळी देण्यात येतील. सदर सभेस आपण स्वतः न चुकता उपस्थित रहावे. प्रतिनिधी पाठविण्यात येऊ नये.

इ. १० वी केंद्रसंचालक सभा आयोजन

वार	दिनांक	सकाळ सत्र वेळ 11 ते 1	केंद्रसंचालक संख्या	दुपार सत्र वेळ 2.30 ते 4.30	केंद्रसंचालक संख्या	स्थळ
बुधवार	11/02/2026	ठाणे, मुंब्रा, कळवा, कल्याण, डोंबिवली, मीरा रोड, नवी मुंबई	132	उल्हासनगर, शहापुर, अंबरनाथ, भिवंडी, बदलापूर, मुरबाड, शहापुर,	194	मुंबई विभागीय मंडळ कार्यालय, सेक्टर १६, वाशी, नवी मुंबई
गुरुवार	12/02/2026	मुंबई पश्चिम विभाग	198	पालघर व रायगड	201	
शुक्रवार	13/02/2026	मुंबई दक्षिण विभाग	112	मुंबई उत्तर विभाग	167	

परीक्षेच्या गोपनीयतेचे गांभीर्य लक्षात घेता परीक्षा व्यवस्थित पार पाडण्याची जबाबदारी आपणावर राहील याची नोंद घ्यावी.

(ज्योत्स्ना शिंदे-पवार)
विभागीय सचिव
महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक
शिक्षण मंडळ, मुंबई विभागीय मंडळ,
वाशी, नवी मुंबई ४००७०३

प्रत माहितीस्तव – १. विभागीय शिक्षण उपसंचालक, मुंबई विभाग
२. शिक्षणाधिकारी (ठाणे, पालघर व रायगड) व
शिक्षण निरीक्षक (मुंबई दक्षिण, पश्चिम व उत्तर विभाग)